स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/२५३ दि. २१/०९/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे शहर,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: क्षयरोग(टीबी) मुक्त भारत अभियान अमलबजावणी करण्याबाबत...
संदर्भ: मा. शहर क्षयरोग अधिकारी, इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेलफेअर सोसायटी–टी.बी. पुणे महानगरपालिका यांचे आय.एच.एफ.डब्लू./पुणे म.न.पा./टी.बी.–४६७/२०२६, दि.१७/०९/२०२६

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये ‘क्षयरोग(टीबी) मुक्त भारत अभियान’ उपक्रमाची अमलबजावणी करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांमार्फत क्षयरोगाच्या(टीबी) लक्षणांबाबत माहिती प्रसार, संशयित व्यक्तींना तपासणीसाठी प्रोत्साहन देणे व सदर अभियानाशी संबंधित विविध उपक्रम राबविण्यात यावेत. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. त्यानुसार आपण आपल्या स्तरावर उचित कार्यवाही करावी. कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक(अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत: मा.शहर क्षयरोग अधिकारी, इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेलफेअर सोसायटी–टी.बी. पुणे महानगरपालिका यांचे पत्र

# इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेलफेअर सोसायटी - टी.बी.
## पुणे महानगरपालिका
डॉ. कोटणीस आरोग्य केंद्र (गाडीखाना), ६६६, शुक्रवार पेठ, मंडई जवळ,
छत्रपती शिवाजी महाराज रोड, पुणे ४११००२ फोन न. ०२०-२४४५१०६२

आय.एच.एफ.डब्लू./पुणे म.न.पा./टी.बी.- ४६७/२०२६ दिनांक : १७/०९/२०२६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक/जावक क्र.: ५६५
दिनांक: 21 SEP 2026
राष्ट्रीय सेवा योजना
शाखा-

प्रति,
मा. संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

विषय : क्षयरोग (टीबी) मुक्त भारत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नवीन/अद्ययावत पत्र निर्गमित करण्याबाबत.

संदर्भ : १. रासेयो/२०२५–२६/३०१, दि. २९/०९/२०२५
२. मा. क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचालनालय, युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार, पुणे यांचे दि. २४/०९/२०२५ रोजीचे पत्र/ई-मेल.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत **'क्षयरोग (टीबी) मुक्त भारत अभियान'** राबविण्याबाबत यापूर्वी सर्व संबंधित रासेयो संलग्नित महाविद्यालये/परिसंस्थांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर अभियानाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी १० **रासेयो स्वयंसेवक / My Bharat Volunteers, NSS/ महाविद्यालयीन विद्यार्थी** तसेच इतर युवकांचा सहभाग घेऊन प्रत्येक क्षयरोग विभागाकरीता जनजागृती, क्षयरोगाच्या लक्षणांबाबत माहिती प्रसार, संशयित व्यक्तींना तपासणीसाठी प्रोत्साहन देणे व अभियानाशी संबंधित विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

खालील क्षयरोग विभाग पुणे महानगरपालिके मध्ये कार्यरत आहे त्या अनुशंघाने विविध अतिजोखीम प्रभाग आम्ही पुणे मनपा मध्ये निवडलेले आहे त्यामुळे पुणे शहरातील सर्व महाविद्यालय करिता पत्र मिळण्यास विनंती आहे.

| अ. क्र. | क्षयरोग युनिट / सुविधा – पूर्ण नाव | संपूर्ण पत्ता | ठिकाण / परिसर | पिन |
|---|---|---|---|---|
| १ | गाडिखाना क्षयरोग युनिट – स्व. डॉ. कोटणीस आरोग्य केंद्र (मुख्य कार्यालय) | ६६६, शुक्रवार पेठ, महात्मा फुले मंडईजवळ, शिवाजी रोड, पुणे, महाराष्ट्र | गाडिखाना / शुक्रवार पेठ | ४११००२ |
| २ | भवानी पेठ क्षयरोग युनिट – स्व. बाई भिकाजी पेस्टनजी बमनजी दवाखाना | भारत टॉकीजच्या समोर, वाघमारे गुरुजी पथ, भवानी पेठ, पुणे, महाराष्ट्र | भवानी पेठ | ४११०४२ |
| ३ | सहकारनगर क्षयरोग युनिट – स्व. शिवशंकर पोते हॉस्पिटल | कांबळे पथ, स्वामी विवेकानंद पुतळ्याच्या समोर, पद्मावती पंपिंग स्टेशनजवळ, विवेक सोसायटी, गोवर्धन सोसायटी, पद्मावती नगर, पुणे, महाराष्ट्र | सहकारनगर / पद्मावती | ४११००९ |
| ४ | हडपसर क्षयरोग युनिट – स्व. अण्णासाहेब मगर रुग्णालय | मगरपट्टा रोड, मगरपट्टा चौक, हडपसर, पुणे, महाराष्ट्र | हडपसर / मगरपट्टा | ४११०२८ |
| ५ | कोथरूड क्षयरोग युनिट – सुतार रुग्णालय | ओम त्रिमूर्ती कॉलनी, गुजरात कॉलनीजवळ, आझाद नगर, शास्त्री नगर रोड, पौड रोड, कोथरूड, पुणे, महाराष्ट्र | कोथरूड | ४११०३८ |
| ६ | गांधीनगर क्षयरोग युनिट – भारतरत्न स्व. राजीव गांधी रुग्णालय | राजीव गांधी रुग्णालय इमारत, पर्णकुटी पोलीस चौकीच्या समोर, डेक्कन कॉलेज रोड, येरवडा, पुणे, महाराष्ट्र | येरवडा / गांधीनगर / बंड गार्डन | ४११००६ |

| अ. क्र. | क्षयरोग युनिट / सुविधा – पूर्ण नाव | संपूर्ण पत्ता | ठिकाण / परिसर | पिन |
|---|---|---|---|---|
| ७ | हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे रुग्णालय | लक्ष्मी नारायण रोड, मित्र मंडळ रोडच्या समोर, पर्वती पायथा, पुणे, महाराष्ट्र | स्वारगेट / पर्वती पायथा | ४११००९ |
| ८ | डॉ. नायडू रुग्णालय – कमला नेहरू रुग्णालय | मंगळवार पेठ रोड, कसबा पोस्ट ऑफिसजवळ, गांधीनगर, मंगळवार पेठ, पुणे, महाराष्ट्र | मंगळवार पेठ / कसबा पेठ | ४११०११ |
| ९ | स्व. मिनाताई ठाकरे प्रसूतिगृह | कोंढवा खुर्द, पुणे, महाराष्ट्र | कोंढवा | ४११०४८ |
| १० | दळवी क्षयरोग युनिट – दळवी रुग्णालय | बाबुलाल शेख पथ, वीर नरवीर तानाजी वाडी जवळ, शिवाजीनगर, पुणे, महाराष्ट्र | शिवाजीनगर | ४११००५ |
| ११ | लोहगाव क्षयरोग युनिट – गंगाराम कर्णे दवाखाना | नगर रोड, सह्याद्री रुग्णालयाजवळ, पुणे, महाराष्ट्र | शास्त्रीनगर | ४११०१४ |

सदर नवीन पत्र प्राप्त झाल्यास संबंधित महाविद्यालये, रासेयो कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक, My Bharat Volunteers/NSS व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अभियानामध्ये सक्रिय सहभाग घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे सुलभ होईल.

कृपया सदर बाबीस प्राधान्य देऊन आवश्यक ते **नवीन/अद्ययावत पत्र निर्गमित करावे**, ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

श्री. सागर पुजारी
जिल्हा कार्यक्रम समन्वयक (NTEP)
पुणे महानगरपालिका

Integrated Health and Family Welfare Society (TB) for PMC ★
Reg. No. F-21027/Pune Pune-411 002.

डॉ. प्रशांत बोठे
शहर क्षयरोग अधिकारी
पुणे महानगरपालिका